


# प्रकरण पहिले

## -भारतीय कृषी विकासाचे डावपेच आणि मुल्यमापन.

स्वातंत्र्या पुर्वी
-भारतीय शेतीचा
विकास.

## प्रकरण पहिले.

## स्वातंत्र्य पुर्वी भारतीय शेतीचा विकास

१] भारतीय अर्थव्यवस्थेत भारतीय शेतीला अनन्य साधारण महत्व आहे. भारतातील शेती व्यवसाय म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा होय. हा व्यवसाय फार पुरातन काला पासून केला जाणारा अत्यंत महत्वाचा व्यवसाय आहे. जवळजवळ ख्रिस्तपूर्व ४००० वर्षा पासून ते आज पर्यंत शेती व्यवसाय केला जातो तरी सुध्दा भारतीय शेती व्यवसायाचा म्हणावा तीतका विकास झालेला नाही त्याचे महत्वाचे कारण म्हणजे, शेती व्यवसायत वापरले जाणारे डावपेच अंत्यत पारंपारीक, चुकीचे, व उशीरा वापरले गेल्यामुळे भारतीय शेतीचा विकास झालेला नाही. ते डावपेच नियोजना पूर्वी व नियोजना नंतर कशा पध्दतीने बदलत गेले त्याचे संशोधनात्मक विश्लेषन केले आहे.

१.१] डावपेच म्हणजे काय [ कृषी विकासाचे]

"कृषी क्षेत्राच्या विकासासाठी वेळो-वेळी ज्या ज्या नवनवीन उद्योगविद्या वापरल्या गेल्या त्याला कृषी विकासाचे डावपेच म्हणतात."

उदा: सिंचन सोईचे बदल, मोटेच्या ठिकाणी ऑईल इंजिन, नंतर इलेक्ट्रीक मोटर बसवुन पाण्याच्या सोई, कालवे, बोरवेल, इत्यादी सिंचन क्षेत्रात नवि उद्योविद्या वापली गेली तसेच नविन बि-बियाणाचा वापर रासायनिक खताचा वापर असे अनेक प्रकारचे वेळो-वेळी नविन उद्योगविद्या वापरल्या गेल्या त्यालाच कृषी विकासाचे डावपेच म्हणतात.

२] ख्रीस्त पुर्व भारतीय शेती.

ख्रिस्त पूर्व भारतीय शेती : ख्रिस्त पूर्व ४००० वर्षा पूर्वी शेतीचा विकास हा हडाप्पा-मोहेंदोजडो यांच्या सुधारणे वरुन लक्षात येते. त्यावेळी गहू, बाजरी, मक्का सारखे धान्य उपयोगासाठी वापरले जात होते. तसेच पाळीव प्राणी म्हैस, उट शेळ्या मेंढयासारखे प्राणी पाळले जात होते त्या प्राण्यापासुन लोकर, मांस, दूध व शेतीची कामे करुन घेतली जात होती. त्यावेळी परिणाम-कारक बाजारपेठ अस्तीत्वात होती हे मोंहिदोजडो येथे सापडलेल्या धान्याच्या कोठारा वरुन दिसून येते

ख्रिस्त पूर्व २००० वर्षा पूर्वी आर्यलोक नैऋत्य कडुन भारतात आले आणि त्यांनी भारतात शेती करण्यास सुरवात केली हे वेदातुन समजले. १००० ख्रिस्त पूर्व ते पूर्वेकडे व दि दक्षिणकडे वळले व त्यांनी तिथे शेती करण्यास सुरवात केली त्यांनी शेतीत अनेक प्रकारच्या योजना यशस्वी राबवल्या त्यावेळी खेडी स्वंयपूर्ण होती. तेव्हा लोक आपल्या गरजेपूरते अन्न धान्याचे उत्पादन करीत असत जवळ जवळ प्रत्येक खेडयात वेगवेगळ्या जातीचे लोक राहत होते. उदा: साळी, कोष्टी, तेली, गुळ तयार करणारे, तेव्हा लोकांच्या गरजा मर्यादित होत्या तेव्हा जास्ती जास्त सुपिक जमिनच वापली जात असत. अलटून-पालटूनपिक घेतले जात आसत ठरावीक ठिकाणी मोटेचा वापर केला जात होता. खतांचा वापर केला जात होता नव्हता त्यामुळे जमिनीचे...

उत्पादन अंत्यत कमी होते. वापरले जाणारे बि-बियाणे जुनी व पारंपारिक असल्यामुळे त्या मुळे उत्पादन कमी होते.

पूर्वीच्या काळी जरी उत्पादन कमी असले तरी त्यांना पुरेल इतके उत्पादन मिळत होते त्यावेळी खेडी स्वयंपूर्ण होती त्यामुळे त्यांच्या गरजा ते आपल्या खेड्यातच पूर्ण करीत असत. उदा: कोष्टी कपडे शिवत असे, तेली तेल काढून देत असे, गुळ बनवणारे गुळ काढून देत असत" असे एकमेकांना एकमेक वस्तु पुरवत असत म्हणजे त्यावेळी देव-घेवीची पध्दत होती पैशाचा वापर केला जात नव्हता मर्यादित लोकसंख्या व विपुल जमिन त्यामुळे पूर्वी सुपिक जमिन पारत होते. परंतु उत्पादन अंत्यत कमी निघत होते कारण खताचा वापर नव्हता जुन्या पध्दतीची बि-बियाणे पावसाच्या पाण्यावर अवलंबुन त्या मुळे उत्पादन अंत्यत कमी होते.

## २) ब्रिटीशांच्या वेळी भारतीय शेतीचा विकास.

१७ व्या शतकात ब्रिटीशांनी ईस्ट इंडीया कंपनीची स्थापना मद्रास, मुंबई, कलकत्ता या ठिकाणी केली त्यांचा प्रमुख हेतु भारतातुन मसालयाचे पदार्थ , लोकर, डायम, कापुस, रेशीम इत्यादी महत्वाच्या वस्तु युरोप मध्ये नेहेल्या जात असत अशा कच्चा मालापासुन ते पक्का माल तयार करुन तो भारतीय बाजारपेठेत विकला जात असत त्यांच बरोबर त्यांनी १७६५ साली बंगाल, बिहार, ओरिसा, आणि १८१८ मध्ये महाराष्ट्र व १८५९ च्या शीख युध्दा नंतर संपूर्ण भारतभर आपले अस्तीत्व निर्माण केले.

त्या नंतर त्यांनी अर्थिक कमतरता भासु लागली तेव्हा भारतात रेव्हिन्यु पध्दत [जमिन फारा] सुरु केली त्यावेळी त्यांची मुख्य अडचण म्हणजे फारा जमा करण्याचा त्या साठी त्यांनी भारतात जमीनदारी व रयतवारी पध्दत सुरु केली अशा जमीनदारा मार्फत त्यांना फारा वसुल करुन घेणे सोपे झाले.

### २.१) जमीनदारी पध्दत:

औरंगजेबाच्या मृत्युनंतर जेंव्हा भारतातील मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली तेंव्हा शेतक-यांकडुन महसुल गोळा करण्याच्या हक्काच्या लिलाव करुन तो महसुल मध्यवर्ती सरकारकडे भरण्याची पध्दत सुरु झाली नंतर काळाच्या ओघात जमीन महसुल गोळा करण्याचा लिलाव प्रतिवर्षी केला जाण्याऐवजी दर पाच वर्षांनी. लिलाव केला जाऊ लागला. आणि कांही बाबतीत अशा लिलावात सर्वाधिक रक्कमेची बोली करणा-याला मालक-शेतक-यांकडुन जमीन महसुल वसुल करण्याचे व तो महसुल सरकारकडे भरणा करण्याचे वंशपरंपरागत अनुवंशीक अधिकार मिळु लागले.

अशा परिस्थितीत जेंव्हा लॉर्ड कॉर्नवॉलिस भारतात आला आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या सत्ते खाली बंगाल मध्ये ही पध्दती प्रचलित असल्याने त्यांनी पाहीले तेंव्हा लिलावाच्या पध्दतीने महसुल गोळा करणारे लोक त्या जमिनीचे प्रत्यक्षातील मालक म्हणजे

जमीनदार आहेत असे त्यांनी मानण्याचे ठरविले कॉर्नवॉलिस स्वतः एक मोठा जमिनदार असल्यामुळे त्यांनी भारतातील जमिन महसूल गोळा करणाऱ्यांना त्यांनी जमिनमालकीचा हक्क दिला स्वाभाविक यांचा अर्थ असाकी जे मालक शेतकरी वस्तुतः जमिनीचे मालक होते अशामुळच्या मालकांना जमिनीचा मालकी हक्क गमवावा लागला आणि जमिन-दाराच्या नवीन वर्गाचे जमीन कसण्याचे काम करणाचा केवळ दर्जा त्यांना प्राप्त झाला.

स्थुलमानाने जमीनदारीचे प्रमुख दोन प्रकार होते त्या पैकी एक प्रकारात जमीन दारानी भरावयाचा जमीन महसूल कायमचा निश्चित करण्यात आला होता आणि महसुलाच्या त्या रक्कमेत सरकारकडून वाढ केली जाणे शक्य नव्हते महसुलाच्या मार्गाने ईस्ट इंडिया कंपनीला काही एक स्थिर रक्कम मिळत होती आणि ईस्ट इंडिया कंपनीशी एकनिष्ट असणाऱ्या लोकांचा वर्ग निर्माण केला जावा ही त्या मागील कल्पना होती पण आपल्या कुळाकडून जमा केले केला जाणारा खंड वाढविण्यास त्या जमिनदारांना परवानगी होती पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, मद्रासचा ( म्हणजे आलीचा तामिळनाडू ) आता काही भाग आणि उत्तर प्रदेश व आसाम ह्या राज्यांचा काही भाग ह्या भागांत हि पध्दती प्रचलित होती.

जमिनदारी भू-धारणधिकारांच्या दुसऱ्या प्रकारात जमीन दारांनी सरकारकडे भरणा करावयाच्या जमीन महसुलाची रक्कम वेळोवेळी वाढविली जात असे जमीनदारीची ही पध्दती उत्तर प्रदेशाच्या कांही भाग आणि मध्य प्रदेशाचा कांही भाग ह्या भागात प्रचलित होती या पध्दतीला "मालगुजार" पध्दत म्हणले जाऊ लागले.

जमिनदारी पध्दत ब्रिटीशांनी सुरु केली त्यांना त्यापासुन फायदा मिळाला कारण जमिन महसुल करण्यासाठी त्यांना हा वर्ग अत्यंत उपयोगी पडला त्या मुळे त्यांना महसुलीच्या मार्गाने भरपूर उत्पन्न मिळाले तसेच त्याचा महत्वाचा उद्देश हा होता की ईस्ट इंडिया कंपनीशी एक निष्ट असणाऱ्या वर्ग निर्माण केला जावा जमिनदार वर्ग ह्या पध्दती मुळे ऐषआरामात होते कारण खंड व सारा यांच्यातील जो फरक मिळत होता त्या मुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा मिळत आते आणि ते जमिनीचे स्वःता मालक झाले होते.

३.२) <u>महालवारी पध्दती:-</u>

महालवारी पध्दती नुसार जमिनीची संयुक्त मालकी गावातील लोकांच्या सह हिस्सेधारकांकडे राहते अशा जमिनीच्या संयुक्त मालकीला सरकारने मान्यता दिली. सरकार संबंध शेतीवाडीचा जमीनमहसुल म्हणुन एक विशिष्ट रक्कम ठरवुन देते त्या शेतीवाडीची संयुक्त मालकी त्या लोकांकडे असते ते सर्व लोक त्या शेतीवाडीच्या जमिन महसुलाची रक्कम सरकारकडे भरण्यास व्यक्तीशः व संयुक्त रीतीने जबाबदार धरले जातात पंजाब मध्ये जमिनीची संयुक्त मालकी त्या लोकांकडे असते त्या व्यक्ती प्रमुख म्हणुन ओळखले जाते ती जमिन महसुल गोळा करुन ती सरकारकडे भरणा करती.

महालवारी पध्दतीत प्रत्येक गावाचा एक प्रमुख असतो तो स्वतः शेतसारा

गोळा करुन सरकारकडे भरतो त्यामुळे प्रमुख या पध्दतीत गावचा प्रमुख मानुसाचा संबंध सरकारकडे येत असे त्या मुळे त्याला सारा जमा करुन भरण्यात अडचण येत नसे


२.३] <u>रयतवारी पध्दती:-</u>

हि पध्दती एलफिन्स्टन ह्याने मुंबई इलाख्यात व मद्रासमध्ये प्रचलित केली रयतवारी पध्दतीनुसार जमीन कसण्याचे काम करणारेच त्या जमिनीचे मालकी असतात रयतवारी पध्दतीत जो प्रत्यक्ष कसणारा असतो आणि तो त्या जमीनीचा मालक ही असतो शेतकरी आणि सरकार या मध्ये कोणताही मध्यस्थ नसतो ते स्वःता जमिनमहसूल सरकारला भरतात.

९रयतवारी पध्दतीत जमिनीचा सारा( जमिन महसूल भरणार हा स्वतः जमिनचा मालक असतो त्यामुळे महसूल हा योग्य जातो कारण त्याच्या मध्ये मध्यस्थ नसतो त्या मुळे हि पध्दत जमिनदारी व महालवारी पध्दती पेक्षा योग्य व शेतक-याच्या दृष्टीने फायदयाची आहे.

४] <u>कृषी बदल :-</u>

भारतीय शेती उत्पादनातील बदल स्वांतत्र्यापूर्वी कमी जास्त आणि हळु होत होते. अन्न धान्याचे उत्पादन १८९० साली दर हेक्टरी ६९५ किलो होते तर तेच उत्पादन १९११ ते १९१५ या दरम्यान ७५० किलो झाले [दर हेक्टरी] परत ते १९४० साली दर हेक्टरी उत्पान कमी होऊन ६७५ किलो इतके झाले. एकूण अन्नधान्याचे उत्पादन १९९० ४१ दशलक्ष टन तर १९११ आणि १५ साली ४७ दशलक्ष टन त्यानंतर ४५ दशलक्ष टन होते.




Total value of agricultural output, British India, at 1924–25 to 1928–29 prices:-

Source: Policy Planning for Agricultural Development

कृषी उत्पादन व लोकसंख्या वाढीचा दर १८९२ ते १९४७. तक्ता 1.1

| प्रदेश | लोकसंख्या | सर्व पिके | अन्नधान्य | अन्न धान्यतील रिक्त |
|---|---|---|---|---|
| [ब्रिटीश भारत | ०.६७ | ०.३७ | ०.११ | १.३१ |
| ग्रेटर पंजाब | ०.९३ | ११.५७ | १.१० | २.४० |
| मद्रास | ०.८० | ०९६८ | ०.४२ | २.३७ |
| बॅम्बे सिंध | ०.७१ | ०.६६ | ०.२७ | १.४४ |
| सेंट्रल प्रोव्हीन्स | ०.५८ | ०.४८ | ०.२९ | ०.९७ |
| युनिट –"– | ०.४० | ०.४२ | ०.३५ | ०.९२ |
| ग्रेटर बंगाल | ०.६५ | ०.४५ | ०.७३ | ०७३३ |

Source :- Policy Planning For Agricultural Development

## ५) स्वातंत्र्य पूर्वी भारतीय शेतीचा विकास:-

५.१] जमिन :- स्वातंत्र्या पूर्वी प्रमुख १८ पिकांच्या बाबतीत १८९० च्या दरम्यान ७० दशलक्ष हेक्टर जमिन उत्पादनाला होती ती १९४० पर्यंत ८० दशलक्ष हेक्टरच्या वरती गेली त्या वेळी संपूर्ण जमिन उत्पादनासाठी प्रत्येक वर्षी २०० हजार हेक्टर सरासरी होती म्हणजे ०.२५ टक्के प्रत्येक वर्षी होते.

इतर धान्य बाबतीत १८९२ आणि १९१६ मध्ये २० टक्के जमिन उत्पादनासाठी वाढली गेली.

५.२] सिंचन सोई :- पाणी पुरवठा हे अंत्यंत महत्वाचे साधन शेती व्यवसायच्या विकासाला उपयुक्त आहे. सिंचनाच्या बाबतीत प्रत्यक वर्षी वाढ होत गेली हे आपल्याला तक्ता आकृती क्रमांक २ वरून लक्षात येईल १८९२–१८९६ दरम्यान एकुण जमिन ७१.२ मिलीयन हेक्टर जमिन प्रमुख १८ पिकांच्या बाबतीत पाण्याखाली आली हे प्रमाण प्रत्येक वर्षी वाढतच होते १९४२ ते ४६ या दरम्यान एकुण जमिन ८३.० मिलीयन हेक्टर जमिन पाण्याखाली आली या वरून आते लक्षात येते की जर वर्षी जमिनीला होणारा पाणी पुरवठावाढत होता परतुं वाढ हळू हळू होती.


५.३] पत पुरवठा : कोणताही व्यवसाय करावयाचा असेल तर अगोदर

Table No. 1.2.

| Years. | Land under Food grains million hectare | Land under Non-food grain million hect. | Net Area Irrigated. % |
|---|---|---|---|
| 1892 - 96 | 59.1 | 12.1 | 17.9 |
| 1902 - 06 | 60.7 | 13.0 | 20.3 |
| 1912 - 16 | 63.5 | 14.6 | 21.3 |
| 1922 - 26 | 63.9 | 15.0 | 21.8. |
| 1932 - 36 | 59.1 | 15.0 | 23.0 |
| 1942 - 46 | 68.4 | 14.6 | 26.1 |

Source :- Policy Planning For Agricultural Development.

आकृती क्रमांक 2




2.2. Per cent of land irrigated in each region, British India, 1891–1945.

Source – Policy Planning for Agricultural Development

पैसाची गरज असते म्हणूनच भांडवल हे महत्वाचा घटक आहे. शेती व्यवसाय करावयाचा झाल्यास पैसाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यांतल्या पूर्वी असे भांडवल जमा करण्यासाठी शेतकरी कर्ज घेत असत. ही कर्ज सावकार देत असे सी त्या साठी ठराविक प्रकारचा करार [बॉंड] तयार करुन घेऊन शेतक-याला पैसे देत असत आणि पैसाला व्याज जास्त असत त्यामुळे सहसा असी कर्ज फेडली जात नसत त्यामुळे भारतीय शेतकरी हा "कर्जात जन्मतो कर्जात जगतो, आणि कर्जात मरतो", असा कर्जाचे धक्काकोचे प्रमान १९११ साली ३ कोटी रुपये [3 billion] तर १९३८ साली १८ कोटी रुपये [18 billion] होते.

भारतातील सावकारी व्यवसायात अनेक प्रकारचे गैरव्यवहार आणि अनिष्ट पध्दती आढळून येतात खोटया कल्पनांसाठी कारणांसाठी बॉंड आणि कच्च चिठ्ठी लिहून घेणे प्रत्यक्षात घेतलेल्या कर्जा पेक्षा अधिक रक्कमेची नोंद करणे कर्ज प्रत्यक्षात दिली जाण्यापूर्वी फार मोठ्या दराने आकार कापून घेणे, हिशोबाबद्दल गुप्तता राखणे, कर्जदाराने व्याज भरलेल्या व कर्जाचे हप्ते फेडण्याच्या योग्यावरच्या शेतक-याला न देणे अखेरेस कर्जधाराने कर्ज फेड न केल्यास कर्जदाराने गहाण ठेवलेली जमीन सावकाराने आपल्या ताब्यात घेणे असे सावकार करीत १९०४ साली सहकारी पत पेढया स्थापन केल्या गेल्या पण खरी सुरवात १९७० साली तरी सुध्दा ती सुरवात अत्यंत मर्यादित होती तेंव्हा फक्त साडेपांच कोटी लोक सहकारी संस्थेचे मेंबर [सभासद] होते. तरी सुध्दा शेतकरी हा अज्ञानी असल्यामुळे त्याला शेवटी सावकारच महत्वाचा घटक होता कारण सावकाराक सावकाराकडून कर्ज घेणे हे त्याला अत्यंत सोय होते. म्हणून भारतात अजून देखील सावकाराचे महत्व आहे.

५.४] रेल्वे व दळणवळण


भारतीय शेती व्यवसायात रेल्वे व दळणवळण याला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. ब्रिटिशांचे आपल्या सोई साठी भारतात प्रथम रेल्वे सुरु केली कारण त्याने भारतात ईस्ट इंडिया कंपनी स्थापन करुन त्या मार्फत कच्चा माल गोळा केला जाई त्या साठी त्यांनी असामाल एकत्र गोळा करण्यासाठी रेल्वे सुरु केली १८५३ साली पहिले २० मैल रेल्वे सुरु केली त्या नंतर १९०० पर्यंत जवळजवळ २५००० पर्यंत रेल्वे लाईन तयार झाली त्याच वेळी त्यांनी रस्ते सुध्दा तयार केले त्यामुळे त्यांना खेडेगावातील कच्चामाल गोळाकरुन ते त्यांच्या कंपनी पर्यंत पोहचू लागला.

५.५] <u>किंमतीतील बदल:</u>

आकृती

किंमत पातळीत कायम बदल होत असत तक्ता क्रमांक ३ वरुन आपल्याला असे लक्षात येईल की १९०० ते १९१५ पर्यंत शेती मालाच्या किंमतीत कमी अधिक बदल होत होते. १९२२-२३ च्या दरम्यान शेती मालाच्या किंमती जास्त झाल्या त्यांनतर त्या किंमती कमी-कमी होऊन परत त्या १९३१ -१९३२ च्या दरम्यान १९०० ते १९०५ पर्यंतच्या किंमती एवढया झाल्या.

आकृती क्रमांक - 3




**[redacted]. Price indices of foodgrains, non-foodgrains, and non-agricultural goods, British India, 1900–01 through 1940–41. Sources: Foodgrains and non-foodgrains calculated from (Narain, 1965), Appendix Table 2; non-agricultural goods from (Herdt, 1970).**

Source :- Policy Planning for Agricultural Development

## ६) निष्कर्ष :

ख्रिस्त पूर्व ४००० ते ख्रिस्त पूर्व १००० वर्षां पर्यंत शेतीचा इतिहास पाहिला तर तो अत्यंत मागासलेला होता त्यावेळी शेती स्वयंपूर्ण होती देव-घेवीची पध्दत चालु होती पाणी पुरवठ्या साठी पावसावर अवलंबून रहावे लागत असत जिथे-जिथे विहरी असत तिथे मोटेचा वापर केला जात असे कुठे बि-बियाने खताचा वापर नव्हता त्यामुळे उत्पादन कमी होते पण त्यांना पुरल इतके उत्पादन होत होते.

त्यानंतर मात्र १७ व्या शतकात ब्रिटीशांनी भारतात येऊन ईस्ट इंडियाची स्थापना केली त्यांना शेतीतुन निघणा-या कच्च्या मालाची आवश्यकता भासु लागली तेव्हा त्यांनी भारतीय शेतीत थोडया सुधारणा केल्या सिंचनतोई, कालवे तसेच वाहतुकी साठी रस्ते, रेल्वे सुरु केली पण त्याचा फायदा फक्त ब्रिटीश लोकांनच झाला भारतीय शेतक-याला मात्र यांचा फायदा जास्त झाला नाही.

भारत लोकसंख्या वाढत होती आणि अन्न-धान्याचे उत्पादन प्रमाणात वाढत नव्हती त्यामुळे २० व्या शतकात अन्न-धान्य टंचाई भासु लागली त्यातच पहिले व दुसरे महायुध्द झाले त्यामुळे जास्तच अन्न-धान्य टंचाई भासु लागली भारतीय लोक संख्येला पुरेल इतके अन्न-धान्य उत्पादन होत नव्हते.

त्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला व स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारताचा फाळणीचा प्रश्न निर्माण झाला आणि निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवणे भाग पडले त्यामुळे भारतात अन्न-धान्य टंचाई फारच निर्माण झाली म्हणून आर्थिक विकासाचे प्रयत्न सुरु करुन १९५० मध्ये योजना आयोग स्थापन करुन पंचवार्षीक योजना सुरु केल्या.